मुटाटकर समिती तथा राज्य मागासवर्ग आयोग यांनी त्यांच्या १ ते ७ अहवालात सन १९९३ ते २००० पर्यन्त शासनास सादर केलेल्या इतर मागासवर्ग प्रवर्गाबाबतच्या शिफारशींची अंमलबजावणी कार्यवाही
महाराष्ट्रातील इतर मागासवर्गाच्या यादीत सुधारणा.

## महाराष्ट्र शासन

विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग आणि
विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांक: सीबीसी.१०९८/प्र.क्र.१८५/इमाव-५,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई:४०० ०३२,
दिनांक: १ जानेवारी, २००१

वाचा:-१. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१४६७/म, दिनांक १३ ऑक्टोबर १९६७,

२. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१४६८/म, दिनांक १३ एप्रिल १९६८,

३. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१४६८/म, दिनांक २४ एप्रिल १९६८,

४. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१४६९/५९२३५/ज, दिनांक जानेवारी, १९६९,

५. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१४६८/१४४८७१/ज, दिनांक १५ मार्च १९६९,

६. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१४६९/१४८७७/ज, दिनांक ८ ऑगस्ट १९६९,

७. शासन शुध्दिपत्रक, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१४६९/९४७/ज, दिनांक २७ जानेवारी १९७०,

८. शासन परिपत्रक, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१४७०/१०२६९/ज, दिनांक १४ ऑगस्ट १९७०,

९. शासन निर्णय, शिक्षण क्रीडा व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१४७०/३९५६१/ज, दिनांक ५ जानेवारी १९७१,

१०. शासन निर्णय, शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभाग, क्रमांक विपठ.१६/सीबीसी.१४७१/ १७१४/ज, दिनांक २४ एप्रिल १९७१,

११. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक: विपठ.१६/सीबीसी.१४७२/६०१६/ज, दिनांक १ नोव्हेंबर १९७२,

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी
20 FEB 2001
H-1085(2500-1-01)1
शाखा
प्र. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

१२.शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक: सीबीसी.१४७४/४६६६४/डेस्क-५, दिनांक ९ जानेवारी १९७६ ,

१३. .शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक : सीबीसी.१४७०/१३३९/डेस्क-५, दिनांक २६ जुलै १९७६,

१४. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक :सीबीसी.१४७०/६३११७/डेस्क-५, दिनांक १२ ऑक्टोबर १९७६,

१५. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक :सीबीसी.१४७७/३५२५६/का-५, दिनांक १६ ऑगस्ट १९७७,

१६. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक: सीबीसी.१४७५/२७२/का-५, दिनांक ९ डिसेंबर १९७७,

१७. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक:सीबीसी.१४७७/५१४६५/का-५, दिनांक १३ फेब्रुवारी १९७८,

१८. शासन निर्णय; समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक:सीबीसी.१४७५/२७२/का-५. दिनांक १० एप्रिल १९७८,

१९. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक :सीबीसी.१०७६/१४७३२/का-५, दिनांक ११ सप्टेंबर १९७९,

२०. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक :सीबीसी.१४७८/३५५०१/का-५, दिनांक ५ ऑक्टोबर १९७९,

२१. शासन परिपत्रक, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक: सीबीसी.१०८०/४३५५३/का-५, दिनांक ५ जानेवारी १९८२,

२२. शासन परिपत्रक, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक:सीबीसी.१४७५/१९६०/का-५, दिनांक ३ मार्च १९८२,

२३. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक: सीबीसी.१०८२/२८५६७/(१०६३)/का-५, दिनांक ८ जुलै १९८२,

२४.शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक: सीबीसी.१६८२/५८५५३/(८९२)/का-५, दिनांक २९ जानेवारी १९८३,

२५. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक:सीबीसी.१०८३/४९५६७/(१०७५)/का-५, दिनांक २९जुलै १९८३,

२६. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक: सीबीसी.१६८६/१४६५८/(२४५२)/मावक-५, दिनांक १ एप्रिल १९८७,

२७. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक:सीबीसी.१४८३/७०६५४/(१६५६)/मावक-५, दिनांक २६ऑगस्ट १९८७,

२८.शासन शुध्दिपत्रक, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक: सीबीसी.१४८७/३०५४/(२६२२)/मावक-५, दिनांक १४ फेब्रुवारी १९८९,

२९. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक:सीबीसी.१०९१/३०५/मावक-५, दिनांक १८ जानेवारी १९९३,

३०. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य ,क्रीडा व पर्यटन विभाग,
क्रमांक: संकीर्ण.१०९३/७४९२/प्र.क्र.२८/मावक-५, दिनांक १५ मार्च १९९३,

३१. भारत सरकार कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालय, पत्र क्रमांक ३६०१२/२२/९३/ईएसटी/(एससीटी), नवी दिल्ली, दिनांक ८ सप्टेंबर, १९९३,

३२. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांकः सीबीसी.१०९३/७४९२/प्र.क्र.२८/मावक-५, , दिनांक १९ मे १९९५.

३३.शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक :सीबीसी.१०९३/७४९२/प्र.क्र. २८/मावक-५, दिनांक २२ जून १९९५,

३४.शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक:सीबीसी.१०९३/७४९२/प्र.क्र.२८/मावक-५, दिनांक ९ ऑगस्ट १९९५,

३५.शासन शुध्दिपत्रक, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांकः सीबीसी.१०९३/७४९२/प्र.क्र.२८/मावक-५, दिनांक २० सप्टेंबर १९९६,

३६.शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक:सीबीसी.१०९३/७४९२/प्र.क्र.२८/मावक-५, दिनांक ३० जून १९९७.

**प्रस्तावनाः-**

भूतपूर्व मुंबई राज्यांमध्ये (सद्याचे महाराष्ट्र राज्य) " इतर मागासवर्गीय" हा प्रवर्ग पूर्वीपासून लक्षात घेतला गेला होता. सन १९२८ मध्ये स्टार्ट कमिटीने (१) दलित जाती (२) आदिम जमाती व आदिवासी (३)इतर मागासवर्गीय असे वर्गीकरण करुन ९५ जाती इतर मागासवर्गीय म्हणून निश्चित करुन दिल्या होत्या. एप्रिल १९४२ मध्ये हे वर्गीकरण बदलून (१) इंटरमेडिएट कम्युनिटी व (२) बॅकवर्ड कम्युनिटी असे बदलण्यात आले. भाषावार प्रांत रचनेनंतर १४ मे १९५४ मध्ये ४० जाती विमुक्त जाती म्हणून तर ७ डिसेंबर १९५६ च्या आदेशाप्रमाणे २७ जाती भटक्या जमाती म्हणून जाहीर करण्यात आल्या. त्यानंतर या दोन्ही जाती, जमातींचा एकत्रित विचार करुन थाडे कमिनशनच्या अहवालाच्या आधारे २१ नोव्हेंबर१९६१ च्या शासन निर्णयाअन्वये " विमुक्त जाती व भटक्या जमाती " असा प्रवर्ग निर्माण करण्यात आला. त्यानंतर वरील वाचा यादीमध्ये नमूद केलेल्या दिनांक १६ ऑक्टोबर १९६७ च्या शासन निर्णयाअन्वये इतर मागासवर्गातील प्रवर्गाची यादी शासनाने जाहीर केली. या यादीमध्ये १८० इतक्या जाती समाविष्ट केलेल्या होत्या. या यादीमध्ये वरील संदर्भाधीन विविध शासन निर्णयान्वये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या.

२. केंद्र शासनाने १९७८ मध्ये श्री. बी.पी.मंडल यांचे अध्यक्षतेखाली मागासवर्ग आयोगाची स्थापना केली होती. या आयोगाने सन १९८० मध्ये आपला अहवाल राष्ट्रपतींना सादर केला. या आयोगाने त्यांच्या अहवालामध्ये देशातील निरनिराळया राज्यांमध्ये असणाऱ्या इतरमागासवर्गीय प्रवर्गातील जाती, जमातींच्या याद्या तयार करुन जोडल्या होत्या. मंडल आयोगाच्या या शिफारशी मान्य करण्याचे धोरण केंद्र व राज्य शासनाने स्वीकारले. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसंदर्भात केंद्र शासनाने दि. १३ ऑगस्ट १९९० रोजी एक कार्यालयीन ज्ञापन निर्गमित केले. त्याविरुध्द सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या. त्या प्रलंबीत असतानाच केंद्र शासनाद्वारे २५सप्टेंबर, १९९१ रोजी सुधारीत

आदेश निर्गमित केले. त्यावरही बऱ्याचशा याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या. या सर्व याचिकांचा एकत्रित विचार करुन मुख्य याचिका क्रमांक ९३०/९० इंदिरा सहानी आणि इतर विरुध्द भारत सरकार व इतर यामध्ये दि. १६ नोव्हेंबर १९९२ रोजी दिलेल्या निकालपत्रानुसार सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, राज्य शासन आणि केंद्र शासीत प्रशासने यांना इतर मागासवर्गीयांच्या संदर्भात काही निदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार इतर मागासवर्गीयांच्या यादीमध्ये समावेश करण्यासाठी व वगळण्यासाठी आलेल्या मागण्या व तक्रारी बाबत तपासणी आणि शिफारस करण्यासाठी तसेच इतर मागासवर्गीयांच्या यादीमधील प्रगत व उन्नत गट किंवा व्यक्ती निर्धारीत सामाजिक-आर्थिक निकषानुसार वगळण्याबाबत अभ्यासपूर्ण शिफारसी करण्यासाठी राज्य शासन चार महिन्यांच्या आत स्थायी समिती स्थापन करील, असे निदेश होते. त्यावर सर्वंकष विचार करुन राज्य शासनाने संदर्भाधीन दिनांक १५ मार्च १९९३ च्या शासन निर्णयान्वये स्थायी समितीची स्थापना केली. या समितीचे दि. १९ मे १९९५ च्या शासन निर्णयान्वये "राज्य मागासवर्ग आयोग " असे नामकरण करुन रितसर राज्य मागासवर्ग आयोगाची स्थापना करण्यात आली. राज्यात मंडल आयोगाच्या शिफारशी राज्य शासनाने स्वीकारल्या असून त्यांच्या अंमलबजावणीचे आदेश दिनांक ९ ऑगस्ट १९९५च्या शासन निर्णयाअन्वये देण्यात आले आहेत. त्यानंतर इतर मागासवर्ग प्रवर्गात तसेच विमुक्त जाती/भटक्या जमाती प्रवर्गात समावेश करण्यासाठीच्या अनेक मागण्या शासनाकडे प्राप्त झाल्या व त्या शासनाद्वारे वर नमूद केलेल्या राज्य मागासवर्ग आयोगाकडे तपासणीसाठी पाठविण्यात आल्या. राज्य मागासवर्ग आयोगाद्वारे सन १९९३ ते २००० या कालावधीत एकूण २२६ जातींबाबत ७ अहवाल शासनास सादर केले. सदरच्या अहवालात इतर मागासवर्ग प्रवर्गात समाविष्ट करावे तसेच विमुक्त जाती/भटक्या जमाती प्रवर्गात समाविष्ट करावे म्हणून शिफारस केलेल्या जातींच्या शिफारशींची तपासणी करुन त्यावर निर्णय घेण्याची बाब बऱ्याच कालावधीपासून शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर सर्वंकष विचार करुन शासनाने विमुक्त जाती/भटक्या जमाती प्रवर्गाबाबत तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गाबाबत निर्णय घेतला असून त्यानुसार विमुक्त जाती/भटक्या जमाती यादीतील सुधारणेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात आले आहेत. इतर मागासवर्गाच्या यादीत समाविष्ट करावयाच्या जातीबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>**

१. मुटाटकर समिती तथा राज्य मागासवर्ग आयोग ( खत्री कमिशन) यांनी त्यांच्या १ ते ७ अहवालानुसार (१९९३ ते २००० पर्यन्त) शासनास सादर केलेल्या २२६ जातींच्या शिफारशींपैकी इतर मागासवर्ग प्रवर्गात समाविष्ट करावे अशी शिफारस असलेल्या ४६ जातींचा राज्य शासनाच्या इतर मागासवर्गीयांच्या यादीत नव्याने समावेश करण्यासाठी शासन मान्यता देत आहे.

२. वरीलप्रमाणे इतर मागासवर्ग प्रवर्गात नव्याने समावेश करताना ज्या जातींबाबत यापूर्वीच्या राज्याच्या इतर मागासवर्ग यादीत समाविष्ट असलेल्या जातीसमोर त्या जातीची तत्सम जात म्हणून समाविष्ट करण्याची शिफारस आहे. अशी जात त्या मूळ जातीच्या अनुक्रमांकासमोर त्या जातीची तत्सम जात म्हणून दर्शविण्यात आली आहे.